**वाचले :-**
१)शासन निर्णय क्र.एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र.३३/९२/८, दि.२ डिसेंबर १९९७
२)महाराष्ट्र शासनाकडील शासन निर्णय क्र. अंनियो-२०१९/प्र.क्र.४७०/सेवा-४, दि.९ मे २०२२
३)आदेश क्र.साप्रवि/४/कावि/३२४/२०२४, दि.२३/०१/२०२४
४)मा.अति.आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पीजीआय, वायसीएमएच यांचे पत्र क्र. वायसीएमएच/०४/कावि/०२/२०२५ दि.०१/०१/२०२५
५)श्रीम.सरदार प्रतिक्षा गंगाधर, लिपिक यांचा दि. ०३/०९/२०२४ रोजीचा विनंती अर्ज
६)मा.आयुक्त यांचेकडील दिनांक२४/०१/२०२५ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८,
सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक साप्रवि/३अ/कावि/०६/२०२५
दिनांक ०३/०२/२०२५

**विषय :- लिपिक पदाचा राजीनामा मंजूर करणेबाबत.**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर जाहिरात क्र. १८४/२०२२ अन्वये लिपिक या अभिनामाची रिक्त पदे सरळसेवेने भरणेत आली होती. कर्मचारी निवड समितीने केलेल्या शिफारशीनुसार लिपिक पदावर पे लेवल एस-६ वेतनश्रेणी र.रु. १९९००-६३२०० या वेतनश्रेणीमध्ये प्रथमत: ०२ वर्ष परिविक्षाधीन कालावधीकरीता (Probation Period) तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देणेकामी उपरोक्त वाचले क्र. ३ अन्वये आदेश निर्गत करणेत आला आहे. लिपिक पदावरील श्रीम.सरदार प्रतिक्षा गंगाधर यांनी महाराष्ट्र शासन, तंत्रशिक्षण विभाग येथे वरिष्ठ लिपिक पदावर निवड झाल्याने महानगरपालिका सेवेचा राजीनामा मंजूर करणेकामी विनंती केली आहे. श्रीम.सरदार प्रतिक्षा गंगाधर यांचा मनपा सेवेतील रुजू दिनांक, राजीनामा देण्याचे कारण, मनपा कोषागारात भरलेली रक्कम व पावती क्र. यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कर्मचा-यांचे नाव, पदनाम | मनपा सेवेत रुजू दिनांक | मनपा सेवेचा राजीनामा अर्ज दिनांक | मनपा कोषागारात भरलेली रक्कम व पावती क्र. | मनपा सेवेचा राजीनामा देण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्रीम.सरदार प्रतिक्षा गंगाधर | ०१/०२/२०२४ | ०३/०९/२०२४ | C/१३३९ दि.०३/०९/२०२४ अन्वये र.रु. १९,९००/- | महाराष्ट्र शासन, तंत्रशिक्षण विभाग येथे वरिष्ठ लिपिक पदावर निवड |

उपरोक्त वाचले क्र.५ अन्वये श्रीम.सरदार प्रतिक्षा गंगाधर यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेचा राजीनामा मंजूर करणेकामी विनंती केली आहे. श्रीम.सरदार प्रतिक्षा गंगाधर यांनी मनपा सेवेचा राजीनामा देणेकामी नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीनुसार मनपा कोषागारात मुळ वेतन भरले आहे. श्रीम.सरदार प्रतिक्षा गंगाधर यांच्याकडून उपरोक्त वाचले क्र.४ अन्वये महानगरपालिकेस घरबांधणी कर्ज, घरदुरुस्ती कर्ज, संगणक कर्ज, वाहन कर्ज व कामगार कल्याण निधी कर्ज येणे बाकी नसून सद्यस्थितीत त्यांचेविरुध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नसून त्यांचा लिपिक पदावरील राजीनामा मंजूरीबाबत संबधित विभागप्रमुखांनी स्पष्टपणे शिफारस केली आहे.

सबब, उपरोक्त वाचले क्र.१ व २ चे महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णयामधील तरतुदी, विभागप्रमुखांनी केलेली शिफारस व श्रीम.सरदार प्रतिक्षा गंगाधर यांनी केलेला विनंती अर्ज विचारात घेता मी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, प्रस्तुतच्या आदेशान्वये श्रीम.सरदार प्रतिक्षा गंगाधर यांचा मनपा सेवेचा राजीनामा दि.०४/०९/२०२४ पासून मंजूर करण्यास मान्यता देत आहे. तसेच श्रीम.सरदार प्रतिक्षा गंगाधर यांचा दि.०४/०९/२०२४पासून ते आदेशाचे तारखेपर्यंतचा कालावधी विनावेतनी करण्यात यावा. लेखापरिक्षणार्थ अन्य काही येणे रक्कम निघाल्यास ती श्रीम.सरदार प्रतिक्षा गंगाधर यांनी भरणे बंधनकारक राहील.

प्रस्तुत आदेशाची नोंद श्रीम.सरदार प्रतिक्षा गंगाधर यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

(शेखर सिंह)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

प्रति —
श्रीम.सरदार प्रतिक्षा गंगाधर,लिपिक
प्रत -१. लेखा विभाग २. लेखापरीक्षण विभाग ३. दूरसंचार विभाग ४. माहिती व जनसंपर्क विभाग
५. कामगार कल्याण विभाग ६. माहिती तंत्रज्ञान विभाग ७. साप्रवि टेबल क्र. ७,१०,१२,२२
८.संगणक कक्ष साप्रवि ९. पीजीआय, वायसीएमएच

उप आयुक्त,
सामान्य प्रशासन विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८